दूरध्वनी क्रमांक :- ०२०-२५५०११२३
अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे - ४११ ००५
कार्यालयीन वेळ :- सकाळी १०.०० ते ०५.४५
जेवणाची सुट्टी :- दुपारी ०२.०० ते ०२.३०
खात्याचा ई मेल :-dmcgeneral@punecorporation.org
जावक क्रमांक :-अपिल/३८/२०१६/उआ(सा.प्र.)/430
दिनांक :- १६/११/२०१६

**अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचे कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**अपिल क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा. तथा उप आयुक्त (सा.प्र.)/अपिल/३८/२०१६**

**अपिलकर्त्याचे नांव व पत्ता :-**
श्री. खामकर रमेश विष्णू,
२६४,नारायण पेठ,दै.प्रभात प्रेसजवळ,
पुणे -४११ ०३०.

**जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा :-**
श्री.शाम तारु, प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

जन माहिती अधिकारी,
तथा प्रशासन अधिकारी,
अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट्स) कार्यालय
पुणे महानगरपालिका

श्री. खामकर रमेश विष्णू- अपिलार्थी
विरुध्द
जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका
जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,अतिरिक्त महापालिका आयुक्त इस्टेट्स कार्यालय,पुणे महानगरपालिका

---

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

अपिलार्थी श्री.रमेश विष्णू खामकर, राहणार- २६४, नारायण पेठ,पुणे - ४११ ०३० यांनी दिनांक २८/०९/२०१६ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महापालिका आयुक्त कार्यालय यांचेकडे अर्ज सादर केला आहे. सदरची माहिती ही आस्थापना विभागाशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, महापालिका आयुक्त कार्यालय यांनी सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे वर्ग केला आहे.सदर अर्जातील काही माहिती अतिरिक्त महापालिका आयुक्त इस्टेट्स कार्यालयाशी संबंधित असल्याने दि.७/१०/२०१६ रोजी जन माहिती अधिकारी,अति.महापालिका आयुक्त (इस्टेट) कार्यालयाकडे वर्ग करण्यात आला आहे.

अपिलार्थी यांनी दिनांक २०/१०/२०१६ रोजी त्यांचे मूळ अर्जात, '१.श्री.राजेंद्र जगताप,अति.आयुक्त इस्टेट यांचे केंद्रशासनाकडील मूळ पदावरील वेतनश्रेणी व इतर भत्ते पुणे मनपाच्या सेवेच्या पूर्वी असलेली माहितीची झेरॉक्स प्रत २.पुणे मनपा सेवेत रुजू झाल्यापासून किती वेतन व इतर भत्ते आजमितीस आदा करण्यात आले त्याची झोरॉक्स प्रत ३. श्री.राजेंद्र जगताप यांचे वेतन व इतर भत्ते पुणे मनपा संस्थेने कशाच्या आधारे निश्चित केले त्या परिपत्रक /निर्णय/ठराव झेरॉक्स प्रत इ.बाबत ' माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी जावक क्र.जमाअ/आस्था/४२७१, दिनांक २८/१०/२०१६ रोजी चे पत्रान्वये माहिती पाठविली आहे,तसेच जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,अतिरिक्त महापालिका आयुक्त इस्टेट्स यांनी जावक क्र.अतिमआ ई/२१२,दि.१५/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये माहिती पाठविली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २८/०९/२०१६ | २७/१०/२०१६ | १५/१०/२०१६<br>२८/१०/२०१६ | | १५/१०/२०१६<br>२८/१०/२०१६ |

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण,चुकीची व हेतूपूरस्सर देण्यास टाळाटाळ केल्याचे कारण नमूद करुन दि.२०/१०/२०१६ रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २७/११/२०१६ | २०/१०/२०१६ | | लागू नाही | ८/१२/२०१६ |

सदर अपिलाची सुनावणी दिनांक १५/११/२०१६ रोजी दुपारी ४.३० वाजता उप आयुक्त सामान्य प्रशासन कार्यालय,खोली क्र.२३४,दुसरा मजला,पुणे मनपा भवन इमारत येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस श्री.शाम तारु, जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी हे उपस्थित होते. श्री.अजय कारंडे,उप अधिक्षक हे जन माहिती अधिकारी,अतिरिक्त आयुक्त इस्टेट कार्यालय यांचेतर्फे उपस्थित होते तसेच अपिलकर्ता श्री.रमेश विष्णू खामकर हेही उपस्थित होते.

जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशिल :-

| अ.क्र | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १. | १.श्री.राजेंद्र जगताप,अति.आयुक्त इस्टेट यांचे केंद्रशासनाकडील मूळ पदावरील वेतनश्रेणी व इतर भत्ते पुणे मनपाच्या सेवेच्या पूर्वी असलेली माहितीची झेरॉक्स | **जन माहिती अधिकारी,आस्थापना विभाग यांनी दिलेली माहिती**<br>मुद्दा क्र.१ उपलब्ध माहितीची प्रत यासोबत सादर करीत आहोत.<br>मुद्दा क्र.२ विचारलेली माहिती प्रशासन २ शी संबंधित नाही.<br>मुद्दा क्र.३ विचारलेली माहिती प्रशासन २ शी संबंधित नाही. |